# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

परिपत्रक क्र. आस्था/आरओ/३४/२०२६

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागात कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे या संस्थेमार्फत कार्यरत कुशल / अकुशल कंत्राटी कामगारांना कळविण्यात येते की, कंत्राटदार यांनी त्यांच्यामार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांच्या वेतनातून जानेवारी-२०२६ ते एप्रिल-२०२६ या चार महिन्याच्या कालावधीत रक्कम रु. २००/- प्र.म. कपात केल्याच्या तक्रारी कंत्राटी कामगारांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने कंत्राटदार यांना कंत्राटी कामगारांची कपात केलेली रक्कम कामगारांना परत करण्याबाबत कळविण्यात आले होते. कंत्राटदार यांनी कामगारांची कपात केलेली रक्कम संबंधित कामगारांच्या खात्यात जमा केली असल्याचे कळविले आहे.

सबब, कंत्राटदार यांच्यामार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कामगारांना कळविण्यात येते की, कंत्राटदार यांनी त्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम त्यांना परत केली नसल्यास त्याबाबत दि. २७-१०-२०२६ पर्यंत कुलसचिव कार्यालयात पुराव्यासह लेखी सादर करावे. जर कोणत्याही कामगाराने पुराव्यासह लेखी सादर केले नाहीतर कंत्राटदार यांनी संबंधित कामगारांची रक्कम परत केली असल्याचे ग्राह्य धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे या संस्थेमार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कामगारांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२६/३४ )(
दिनांक :- २२-१०-२०२६ )(

कुलसचिव

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तवः-**

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.
२) प्राचार्य, मॉडेल कॉलेज घनसावंगी, जि. जालना.
३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.
४) कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे.

*****